# बृहन्मुंबई महानगरपालिका

क्र.एमडीएफ/333/जन, दि. २९/०४/२०२४

विषय- सार्वजनिक गणेशोत्सव- २०२४ मूर्तीकारांच्या मंडपाबाबतचे परिपत्रक.

संदर्भ : १. क्र. एमडीएफ/४१८/जन, दि.१२.०५.२०१७

२. क्र. एमडीएफ/ओडी/७२७/जन, दि. १०.०७.२०१७

३. क्र. एमडीएफ/२७/जन, दि. ११.०५.२०२०

४. क्र. एमडीएफ/ओडी/३४८३/जन, दि.२३.०३.२०२२

५. क्र. एमडीएफ/ओडी/३८८१/जन, दि.०१.०३.२०२३

६. क्र. एमजीसी/एफ/३२१७, दि.२९.०४.२०२४

सार्वजनिक गणेशोत्सव २०२४ सुरळीतपणे पार पाडण्याच्या दृष्टीने, गणेश मुर्तीकारांकरिता व विभागास्तरावरील संबंधित कर्मचारी / अधिकारी यांचे करिता खालील परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

१. मुर्तीकार मंडप परवानगीची कार्यवाही विभागस्तरावर एक खिडकी योजनेनुसार संगणकीय (online) प्रणालीद्वारे सहाय्यक आयुक्त व परिमंडळ स्तरावर उप आयुक्त यांचे मार्गदर्शनाखाली राबविली जाईल.

२. विभाग कार्यालयामार्फत मुर्तीकार व मंडपांना परवानगी देताना परिपत्रक क्रमांक एमडीएफ/४१८/ जनरल दिनांक १२.०५.२०१७ मधील तरतुदी विचारात घेण्यात येतील.

३. मुर्तीकार मंडपाकरीता यावर्षी अर्ज सादर करतांना मागील सलग तीन वर्षांच्या परवानगीच्या प्रती अर्जासोबत जोडण्यात याव्यात. त्याआधारे विभाग स्तरावरुन त्यांना मंडपाकरिता परवानगी देण्यात येईल. अशा प्रकरणात नव्याने स्थानिक पोलीस व वाहतूक विभाग यांच्या ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नसेल. परंतु, मागील तीन वर्षांपैकी कोणतीही एक परवानगी नसल्यास, मूर्तीकाराने परवानगीकरिता स्थानिक पोलिस स्टेशन, वाहतूक विभागाचे 'ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

४. सार्वजनिक जागेवर मुर्तीकार/मंडपासाठी नव्याने अर्ज आल्यास विभागीय कार्यालयाकडून परिपत्रक क्र.एमडीएफ/४१८/जन, दि. १२.०५.२०१७ मधील तरतूदीप्रमाणे तपासणी करण्यात येईल. स्थानिक पोलिस स्टेशन, वाहतूक विभागाचे 'ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर नियमानुसार परिमंडळीय उपायुक्त यांच्या मान्यतेनंतर विभागस्तरावर परवानगी देण्यात येईल.

५. बृहन्मुंबई महानगरपालिका मालकीच्या जागेवरील मूर्तीकारांच्या मंडपाला सन २०२४ साठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

६. खाजगी जमिनीवरील जमीन मालकाच्या परवानगीने उभारावयाच्या मंडपाला सन २०२४ साठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

७. प्रत्येक मंडपाकरिता सन २०२४ साठी अनामत रक्कम म्हणून कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही.

८. खाजगी जागेवर अशाप्रकारची परवानगी मागणारा मुर्तीकार हा पारंपारिक मुर्तीकार असणे अनिवार्य असेल व त्यास शहर तथा दोन्ही उपनगरांमधून कोणत्याही एकाच ठिकाणी परवानगी घेता येईल.

९. गतवर्षीप्रमाणे, पर्यावरणपूरक मुर्ती घडविणा-या मुर्तीकारांना प्रोत्साहन देण्याकरिता, गणेशोत्सव २०२४ करिता विभागस्तरावरुन उपलब्ध असलेल्या जागेनुसार प्रथम अर्जदारास प्राधान्य या तत्वावर केवळ पर्यावरणपूरक मूर्ती घडविणा-या मुर्तीकारांस आवश्यक ती जागा विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येईल (अर्जदार हा स्वःत मुर्तीकार असणे अनिवार्य आहे.) व सदर जागेवर मुर्तीकारांना सोयीसुविधा देण्याकरिता रुपये १० (दहा) लाख इतक्या रक्कमेची तरतूद प्रत्येक विभाग कार्यालयास करुन देण्यात येईल.

१०. पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याकरिता मुर्तीकारांना विनामुल्य शाडू माती उपलब्ध करुन देण्यात येईल. परिमंडळीय स्तरावर उप आयुक्त यांनी ठरविलेल्या एका विभागात सुयोग्य अशी जागा निवडून, २०२३ मध्ये जी/ उत्तर विभागाने पार पाडलेल्या प्रक्रीयेनुसार, प्रति परिमंडळ १०० टन शाडू माती मुर्तीकारांना विनामुल्य उपलब्ध करुन देतील. वाढीव मागणी प्राप्त झाल्यास उप आयुक्त आपल्या स्तरावर वाढीव शाडू माती खरेदी करु शकतील.

११. मुर्तीकाराचे घर किंवा मूर्ती बनविण्याच्या जागा प्रकल्पबाधित झाल्यास संदर्भाधीन परिपत्रकातील अटी शर्तीची पूर्तता होत असल्यास नवीन ठिकाणी पूर्वी इतक्या क्षेत्रफळाची परवानगी नव्याने अर्ज प्राप्त झाल्याप्रमाणे परिपत्रक क्र. एमडीएफ/४१८/जन, दि. १२.०५.२०१७ अन्वये देण्यात येईल.

१२. मुर्तिकारांनी मंडप उभारण्यासाठी रस्ते / फूटपाथवर खड्डे खणल्यास परिपत्रक क्र. AMC/ES/4462/III DT. 24.07.2015 अन्वये कारवाई करण्यात येईल.

१३. मुर्तीकारांसाठी मंडपाची परवानगी देताना, सदर परवानगी केवळ मुर्तीकारांसाठी असेल व सदर परवानगीचा उपयोग मुर्तीविक्री करिता केला जाणार नाही याबाबत सोबत जोडलेल्या परिशिष्ट -I प्रमाणे स्वयंघोषित हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१४. संसर्गजन्य आजारांचा (उदा. कोविड-१९ इ.) प्रसार रोखण्याकरिता शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशांचे पालन मुर्तीकारांनी करणे आवश्यक आहे.

१५. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग महाराष्ट्र शासन यांच्या दि. ०१.०२.२०२४ च्या तांत्रिक समितीच्या ५ व्या बैठकीच्या इतिवृत्ताच्या अनुषंगाने कोकोपीट, शाडूमाती व भाताच्या काड्या व त्यावर मातीच्या लेपाचा वापर हा POP ला पर्याय असल्याचे निदर्शनास आले असल्याने वर नमूद केलेल्या पर्यावरणपूरक साहित्याचा वापर करुन मूर्ती घडविणे बाबत सुचविण्यात आलेले आहे. यास्तव, उत्सवादरम्यान मूर्तीचे आगमन / विसर्जन सुकर होईल व स्थापनेदरम्यान मूर्तीचे स्थैर्य (Stability) अभंग राहिल एवढ्या उंचीची मूर्ती घडविण्यात यावी.

१६. केंद्रीय प्रदुषण नियंत्रण मंडळाने दि. १२.०५.२०२० रोजी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे मूर्तीकारांकडून पालन करणे आवश्यक आहे.

सदर सूचना नवरात्र व अन्य उत्सवांकरीताच्या मूर्तीकारांसाठीही लागू राहील, त्यासाठी स्वतंत्र परिपत्रक निर्गमित करण्यात येणार नाही. मूर्तीकारांना आवश्यकतेनुसार मंडप उभारणीसाठी दिलेली परवानगी नवरात्री उत्सवापर्यंत ग्राहय धरण्यात येईल.

मूर्तीकाराने मंडपाच्या परवानगी करिता अर्ज सादर करतेवेळी खालील नमूद परिशिष्ट अर्जासोबत सादर करावे.

सोबतः- 1. परिशिष्ट - I (मूर्तीकारांचे हमीपत्राचा विहित नमुना.)

2. परिशिष्ट -II (अग्नीसुरक्षेबाबत हमीपत्राचा विहित नमुना.)

सदर परिपत्रक दि. ३०.०४.२०२४ पासून अंमलात येईल.

| सही/-२९.०४.२०२४ | सही/-२९.०४.२०२४ | सही/-२९.०४.२०२४ |
| --- | --- | --- |
| उप आयुक्त (परिमंडळ-२) | अतिरिक्त आयुक्त (पूर्व उपनगरे) | बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त |

प्रतः-

सह आयुक्त/ उप आयुक्त (परि-१, ३, ४, ५, ६, ७) महोदय/महोदया,

सहाय्यक आयुक्त (ए ते टी विभाग), महोदय/महोदया,

संचालक (माहिती व तंत्रज्ञान)

अनुज्ञापन अधिक्षक, महोदय,

जनसंपर्क अधिकारी, महोदय,

पूप्रधाग
२९.०४.२४

उप आयुक्त (परि-दोन) यांचे
प्रशासकिय अधिकारी

प्रत माहितीसाठी –

मा. मनपा आयुक्त यांचे स्वीय चिटणीस

मा. अति. आयुक्त (शहर) यांचे स्वीय चिटणीस

मा. अति. आयुक्त (पू.उ.) यांचे स्वीय चिटणीस

मा. अति. आयुक्त (प. उ.) यांचे स्वीय चिटणीस

मा. अति. आयुक्त (प्रकल्प) यांचे स्वीय चिटणीस

पूप्रधाग
२९.०४.२४

उप आयुक्त (परि-दोन) यांचे
प्रशासकिय अधिकारी

परिशिष्ट - I

मुर्ती घडविणा-या मुर्तीकारांचे हमीपत्र

गणेशोत्सव २०२४ साजरा करण्यासाठी लागणाच्या गणेशमुर्ती घडविण्यासाठी लागणा-या मंडप उभारणीच्या परवानगीसाठी मुर्तीकारांनी सादर करावयाचे, हमीपत्र.

मी/आम्ही श्री. ---------------------------------------------------------- गणेश मुर्तीकार / मुर्तीकार संघ याद्वारे खालील बाबींची हमी देत आहे / आहोत-

(१) मी / आम्ही स्वतः मुर्तीकार आहे / आहोत. याबाबीची खातरजमा / पडताळणी महापालिकेच्या अधिकाऱ्यांमार्फत केली जाईल हे मला / आम्हाला मान्य आहे.

(२) सर्व मुर्ती शाडू / पर्यावरणपूरक साहित्याने घडवावयाच्या आहेत ही बाब मला / आम्हाला मान्य आहे.

(३) महापालिकेकडून देण्यात आलेल्या परवानगीचा उपयोग मुर्ती घडविण्यासाठी केला जाईल व मूर्तीविक्रीसाठी सदर परवानगीचा वापर केला जाणार नाही हे मान्य आहे.

(४) सन २०२४ च्या सार्वजनिक उत्सवांसंदर्भात पोलीस, महापालिका, प्रदुषण नियंत्रण महामंडळ यांच्या मार्फत वेळोवेळी देण्यात आलेल्या निर्देशांचे पालन केले जाईल व सदर आदेशांचे उल्लंघन झाल्यास कारवाईस पात्र ठरेन हे मला मान्य आहे.

(----------------------------------)

मुर्तीकारांचे नाव -

## Appendix - I.

## Guarantee of idol makers

Undertaking to be submitted by the sculptors for the permission to construct the Mandap required to make the Ganesha idols to celebrate Ganeshotsav 2024.

I/we were Mr. ______________________________ Ganesha Murtikar / Murtikar Sangh

do/are hereby guarantee the following-

(1) I / we ourselves are idolaters. I / We agree that verification / verification of this matter will be done through the Municipal authorities.

(2) I / We agree that all idols shall be made of Shadu / Eco-friendly materials.

(3) It is agreed that the permission given by the Municipal Corporation will be used for making idols and the said permission will not be used for selling idols.

(4) I agree that the directions issued from time to time by the Police, Municipal Corporation, Pollution Control Corporation regarding the public celebrations of the year 2024 will be followed and any violation of the orders will be liable to action.

(__________________________)

**Sculptor's Name -**

# परिशिष्ट-II

## हमीपत्र

मी/आम्ही ______________________________, वय ________ वर्षे याद्वारे प्रतिपादन करतो की, मी/आम्ही भारतीय रहिवासी / ______________________________ ______________________________ या संस्थेचा अध्यक्ष / सचिव / अधिकृत स्वाक्षरीकर्ता असून संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता ______________________________ ______________________________ आहे.

(1) आमच्या संस्थेचा नोंदणी क्रमांक ________________ असा आहे.

(2) मी/आम्ही असे प्रतिपादन करतो की, मी/आम्ही ______________________________ ______________________________ या ठिकाणी मूर्ती बनवण्यासाठी / गणेशोत्सव-नवरात्रोत्सव साजरा करण्यासाठी तात्पुरता मंडप उभारण्याच्या परवानगीसाठी अर्ज केला आहे.

(3) मी/आम्ही असे प्रतिपादन करतो की, मी/आम्ही बृहन्मुंबई महानगर पालिकेच्या संकेतस्थळावर मुंबई अग्निशमन दलाकडून प्रसारित केलेल्या सांकेतिकीत अग्निसुरक्षा उपाययोजनांचा (Codified Fire Safety Measures) अभ्यास केला आहे. मी/आम्ही अशी हमी देतो कि नमूद सांकेतिकीत अग्निसुरक्षा उपाययोजनांचे (Codified Fire Safety Measures) मी/आम्ही पूर्णपणे पालन करू तसेच ज्याद्वारे आग लागेल अशी किंवा नियमबाह्य कोणतीही कृती मी/आम्ही करणार नाही.

(4) मी/आम्ही अशी हमी देतो की, मंडपामध्ये विद्युत उपकरणे अथवा संसाधने बसविताना ती मान्यताप्राप्त विद्युत निरीक्षक यांच्याकडून प्रचलित विद्युत कायदा आणि नियमांमधील तरतुदीनुसार बसवून घेऊ.

(5) मी/आम्ही अशी हमी देतो की, "महाराष्ट्र आगप्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६" च्या कलम ३ (१) मधील आणि नियम २००९ मधील तरतुदींनुसार, अग्निसुरक्षा उपाययोजनांचा अवलंब करू आणि ही सर्व अग्निसुरक्षा उपकरणे सुस्थितीत ठेवू.

(6) मला / आम्हांला याची जाणीव आहे की, मी / आम्ही "महाराष्ट्र आगप्रतिबंधक आणि जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम, २००६" नुसार निर्धारित केलेल्या अग्निसुरक्षा उपाययोजना तसेच मुंबई अग्निशमन दलाकडून निश्चित केलेल्या सांकेतिकीत अग्निसुरक्षा उपाययोजना (Codified Fire Safety Measures) मधील निर्देशांचे पालन न केल्याचे आढळल्यास अथवा सदर परवानगी व्यतिरिक्त तात्पुरते किंवा पक्के बांधकाम केल्यास बृहन्मुंबई महानगर पालिकेकडून परवानगी रद्द करण्यात येईल.

(7) मला / आम्हांस ही परवानगी दिल्यामुळे महानगरपालिका आयुक्त, मुंबई महानगरपालिका, त्यांचे अधिकारी, कर्मचारी व अभिकर्ता यांना ; त्यांच्या विरोधात करण्यात येणारी कोणतीही कारवाई, नुकसान भरपाई, मागणी, दावे इत्यादि पासून या हमीपत्राद्वारे बंधमुक्त करीत आहोत. उपरोक्त बाबी उद्भवल्यास त्यास सर्वस्वी मी / आम्ही जबाबदार असल्याचे याद्वारे मान्य करीत आहोत व त्याची सर्व जबाबदारी स्वेच्छेने घेत आहोत.

(8) मला / आम्हांला याची पूर्णपणे जाणीव आहे की मी / आम्ही सादर केलेली माहिती खोटी आणि/किंवा चुकीची आढळल्यास मी/आम्ही दिवाणी तसेच फौजदारी कारवाईस पात्र असेन / असू आणि परवानगी शुल्क/ठेवीची रक्कम असल्यास ती जप्त केली जाईल.

(9) मी/आम्ही याद्वारे प्रतिपादन करतो व हमी देतो की हे हमीपत्र मला/आम्हाला/संस्थेचे अध्यक्ष,सचिव,व्यवस्थापकीय समिती व सदस्यांवर बंधनकारक राहील व मी/आम्ही वेळोवेळी केलेल्या कृतींसाठी जबाबदार राहू.

मी/आम्ही ______________________________ असे प्रतिज्ञापूर्वक सांगतो की उपरोक्त माहिती हि माझ्या/आमच्या माहितीप्रमाणे खरी व अचूक असून मी/आम्ही स्वतः पडताळली आहे.

अर्जदाराचे नाव आणि स्वाक्षरी

Annexture II

## UNDERTAKING

I / We ______________________________, aged about __________ years, an Indian inhabitant, the Owner / Proprietor, The Chairman / The Secretary, authorized signatory of the firm / organisation M/s. ______________________ ______________________________ having his / her / its address / office address at ______________________________________________

do hereby state on Solemn affirmation as under:

(1) I / We am / are holding the Registration No. ______________________ for the organization.

(2) I / We state that I / We have applied for permission of the erection of temporary pandal for making idol / celebrating festival of Ganpati-Navratri at ______________________________________________.

(3) I / We state that I / We have gone through the codified fire safety measures of Mumbai Fire Brigade on BMC portal to be complied in respect of the above said permission & using temporary structure and I / We hereby declare that all the fire safety measures are / will be complied all the time by me / us. I / We shall not indulge into any activity which may cause fire hazard and against the provisions of law.

(4) I / We say and undertake that the electrical fittings / fixtures installed in the premises are as per the prevailing Electricity Act and the Rules, from Govt. approved Electrical Inspector.

(5) I / We say and undertake that as per the provisions of Section 3 (1) of "The Maharashtra Fire Prevention and Life Safety Measures Act, 2006" and Rules 2009, fire safety measures will be provided on the said premises & will be maintained in good working condition.

(6) I / We say and undertake that, if it is revealed that the codified requirements of Mumbai Fire Brigade / requirement as per Maharashtra Fire Prevention and Life Safety Measure Act, 2006 and any competent Municipal Authority are not complied by me / us and also any unauthorized construction is/ are found carried out by me/ us, then the BMC shall be at liberty to suspend/ revoke the aforesaid permission with immediate effect.

(7) I / We hereby Indemnify the BMC from and against all actions, acts, costs, claims, damages, demands of any nature and kind whatsoever, which may be instituted, claimed or made against the BMC, its officers, servants and agents and the Municipal Commissioner for BMC by any person or persons, any third party or legal entity by reasons of the BMC having granted to me / us the said permission as per Mumbai Municipal Corporation Act, 1888.

(8) I / We are aware and accept that I / We shall be liable to civil as well as criminal prosecution in the event information submitted by me / us are found to be false and / or incorrect and permission fee/ deposit amount if any paid by me / us shall be forfeited.

(9) I / We say and undertake that the undertaking is binding on me / us / Chairman / Secretary/Managing Committee members who are responsible for the acts done by the firm/organisation from time to time.

I / We ------------------------------ state on solemn affirmation that whatever stated herein above is true to my / our own knowledge and I / We believe the same to be true and correct.

Name & Signature of Applicant